ISSN: 2249-894X IMPACT FACTOR : 3.8014 (UIF)

REVIEW OF RESEARCH

VOLUME - 6 | ISSUE - 9 | JUNE - 2017

# हिंदुस्थानच्या स्वातंत्र्य लढ्यातील आणि हैद्राबाद व गोवा मुक्ती संग्रामातील बार्शी तालुक्याचे योगदान



**प्रा. डॉ. बळीराम हणुमंत जाधव**
**मु. पो. आगळगाव, ता. बार्शी, जि. सोलापूर.**

## प्रस्तावना :

हिंदेस्थानातील क्रांतीकारी चळवळीचे महाराष्ट्र हे प्रमुख केंद्र होते. अशा या महाराष्ट्रातील सोलापूर जिल्ह्याला प्राचीन इतिहास लाभलेला आहे. या जिल्ह्याने अनेक राजवटी पाहिल्या आहेत. इ. स. पू. ९० ते इ. स. ३०० या काळात सोलापूरच्या प्रदेशावर सातकर्णी सत्ताधिशांचे राज्य होते. पुढे इ. स. ५५० ते इ. स ७६० या काळामध्ये चालुक्याचे, इ. स. ९७३ पर्यंत राष्ट्रकुटांचे, त्यानंतर १३ व्या शतकापर्यंत देवगिरीच्या यादवांचे राज्य होते. या यादवांचा पुढे मुस्लिमांनी पाडाव केल्यानंतर हा प्रदेश इ. स १३४७ मध्ये हसण गंगू याने स्थापन केलेल्या बहामणी सत्तेच्या अधिपत्त्याखाली आला. प्रशासनाच्या सोयीसाठी त्याचे ११ विभाग पाडण्यात आले. पुढे सत्ता संघर्षातून या विभागांपैकी बार्शी, माढा, परांडा व करमाळा हे प्रदेश 'ख्वाजा जहानला' कडे अनेक वर्ष राहिले. नंतर हा प्रदेश निजामशहाच्या अधिपत्त्याखाली येऊन, त्याने हा प्रदेश त्यांच्याकडे आलेल्या निंबाळकरांना दिला.[१] आजही या निंबाळकरांचे वंशज बार्शी तालुक्यातील वैराग, पानगाव व शेंद्री येथे वास्तव्यास आहेत. १९ फेब्रूवारी १८१८ रोजी जनरल स्मिथ याने पेशव्यावर मिळविलेल्या विजयाने सोलापूर जिल्हा ब्रिटिशांच्या ताब्यात गेला.[२]

इ. स. १८१८ मध्ये पेशवाईच्या अस्तानंतर तत्कालीन सोलापूरच्या प्रदेशातील २६१ गावे ब्रिटिशांच्या अधिपत्त्याखाली आली. यातील १२३ गावे बार्शी तालुक्यातील होती. इ. स. १८३८ मध्ये सोलापूर, बार्शी, मोहोळ, माढा, करमाळा, इंडी, हिप्परगी आणि मुद्देबिहाळ यांचा मिळून सोलापूर जिल्हा तयार झाला. इ. स. १८६४ मध्ये तो पुन्हा विखुरला.[३] इ. स. १९५६ च्या राज्यपुनर्रचनेनुसार सोलापूर जिल्हा तत्कालीन मुंबई राज्यामध्ये होता. इ. स. १९६० मध्ये महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीनंतर सोलापूर हा महाराष्ट्र राज्यातील एक जिल्हा बनला.[४] अशा या सोलापूर जिल्ह्यामधील बार्शी हा एक सामाजिक, सांस्कृतिक, ऐतिहासिकदृष्ट्या समृध्दशाली तालुका आहे.

ब्रिटिशांच्या विरोधात देशाप्रमाणेच महाराष्ट्रातील सोलापूर जिल्ह्यामध्ये कायदेभंग, असहकार, सत्याग्रह यांनी तीव्र स्वरूप धारण केले होते. यामध्ये बार्शी तालुक्याचे योगदान मोठे आहे. इ. स. १९२१ मध्ये महात्मा गांधींची बार्शी नगरपालिकेच्या मैदानावर खूप मोठी सभा झाली होती. या सभेनंतर बार्शी शहर व तालुक्यामध्ये स्वदेशी, ग्रामोद्योग अशा विधायक कामांनी जोर धरला.[५] इ. स. १९३० मधील महात्मा गांधींच्या मिठाच्या सत्याग्रहाला पाठींबा देण्यासाठी बार्शी तालुक्यामध्ये एक मोहीम राबविण्यात आली. सभेमध्ये समुद्राचे पाणी आणून मीठ बनविण्याच्या सत्याग्रहामध्ये बार्शी तालुक्यातील अनेक लोक सहभागी झाले होते. यामध्ये प्रामुख्याने बार्शीचे भगवंतराव कथले, डॉ. व्यंकटप्रसाद पांडे, शिवाजीभाई आर्य, भिमाशंकर वायचळ, दिगंबर देवधरे, शंकर बेले, बापूराव मठपती, जगदाळे मामा, माणिकराव देशमुख, दहिटणेचे बाबू राऊत, सोपान काशीद, सोपान जाधव, बाजीराव काशीद. याशिवाय उपळे दुमाला या गावचे लक्ष्मण बुरगुटे, बाबुलाल वखारिया, रंगनाथ नेवाळे, दत्तोबा जाधव, चंद्रहास जाधव, वाघमारे, मळेगावचे मुंबरे तर येडशीचे गुरव यांचे योगदान महत्वपूर्ण होते. शाहीर हरीभाऊ भंडारे यांनी पोवाड्याच्या कार्यक्रमाद्वारे बार्शी तालुक्यामध्ये लोकजागृतीचे मोठे काम केले. या कामामध्ये त्यांना दिगंबर देवधरे यांनी मोलाची साथ दिली. इ. स. १९३९ मध्ये दुसऱ्या महायुध्दाच्या विरोधात काँग्रेसने सत्याग्रह सुरू केला. बार्शी तालुक्यानेही याला सक्रिय पाठींबा देऊन कायदेभंग, इंग्रजविरोधी व्याख्याने व मोर्चे या माध्यमातून संपूर्ण तालुका हलवून सोडला.

इ. स. १९४१ च्या महात्मा गांधीच्या वैयक्तिक सत्याग्रहामध्ये बार्शी तालुक्यातील डॉ. व्यंकटप्रसाद पांडे, शंकर गोईलकर, आझाद मास्तर, शिवाजीभाई आर्य, दिगंबर शिराळ, बाबुराव राऊत, गेनदेव जाधव, सोपान काशीद यांनी भाग घेतला होता. इ. स. १९४२ च्या ' छोडो भारत ' चळवळीमध्ये डॉ. व्यंकटप्रसाद पांडे यांनी भाग घेऊन इतर कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करण्याचे काम केले. त्यांचे स्वत:चे घर या

चळवळीचे केंद्र बनले होते. यावेळी मिरवणुका काढणे, परदेशी मालाच्या होळ्या करणे, नगरपालिकेवर तिरंगा झेंडा लावणे असे कार्यक्रम बहुसंख्य कार्यकर्त्यांनी भूमिगत राहून केले.[६]

महात्मा गांधींच्या नेतृत्वाखाली सुरू झालेल्या भारतीय स्वातंत्र्य चळवळीमध्ये स्त्रियांही मोठ्या प्रमाणामध्ये भाग घेऊ लागल्या. सोलापूर जिल्ह्यातील पहिल्या महिला सत्याग्रही म्हणून पित्रे यांचा उल्लेख केला जातो. श्रीमती विमल कोटणीस यांनी इ. स. १९४२ च्या चळवळीत भूमिगत राहून कार्य केले. या चळवळीमध्ये बार्शी तालुक्यातील प्रभाताई सुलाखे, वीणा सुराणा, जानकीबाई लागू यांनी महत्वाचे योगदान दिले. राष्ट्रसेवा दलाच्या माध्यमातून कुंदा जगदाळे यांनी मोलाचे कार्य केले.[७]

इ. स. १९३५ मध्ये बार्शीमध्ये डॉ. राजेंद्रप्रसाद आले होते. त्यावेळी बार्शी शहर क्राँग्रेस कमिटीतर्फे शहरातील तेलगिरणी चौकामध्ये जाहीर सत्कार केला होता. यावेळी त्यांच्या व्याख्यानामुळे लोकांमध्ये स्वातंत्र्य चळवळीसंदर्भात मोठा उत्साह वाढला होता. मात्र सरकारच्या दडपशाहीमुळे तत्कालीन बार्शी नगरपालीकेला ईच्छा असूनही त्यांचा सत्कार करता आला नाही. याच तेलगिरणी चौकात पुढे १५ फेब्रुवारी १९३७ रोजी पंडीत जवाहरलाल नेहरू यांची जाहीर सभा झाली होती. यावेळी बार्शी नगरपालीकेने त्यांना मानपत्र देऊन त्यांचा सन्मान केला होता. आश्चर्याची बाब म्हणजे यावेळी सरकारने कोणतीही हरकत घेतली नाही. अर्थात देशाच्या राजकारणातील अशा महान विभूतीच्या भेटीतून तालुक्याचे राजकीय महत्व लक्षात येते.[८]

इ. स. १९२८ पासून बार्शी तालुक्यातील महादेव अप्पा खुडे यांनी भारतीय स्वातंत्र्य चळवळीमध्ये सक्रीय सहभाग घेतला होता. गांधीजींच्या मिठाच्या सत्याग्रहामध्ये त्यांचा सहभाग होता. इ. स. १९३० मध्ये सोलापूरला पुकारलेल्या ' मार्शल लॉ ' मध्ये महादेव अप्पा खुड यांना अटक होऊन सहा महिने तुरुंगवासाची शिक्षा झाली होती. बार्शीचे श्री. रुद्राप्पा वीरभद्र पोटे यांनी भारतीय स्वातंत्र्य लढयात राष्ट्रसेवा दलाच्या माध्यमातून काम केले. प्रौढ वर्गाला साक्षर करण्यासाठी त्यांनी प्रौढ साक्षरता वर्ग चालविले. कामगारांना जागृत करण्याचा प्रयत्न केला. श्री. ना. ग. गोरे यांच्या नेतृत्वाखाली पुणे येथील सरकारी धान्याच्या कोठारावर झालेल्या सत्याग्रहामध्ये त्यांनी सहभाग घेतला होता. यामुळे त्यांना अटक झाली व त्यांची नोकरीही गेली.[९]

श्री. सदाशिव रामलिंग ढोले यांना पत्रके वाटणे, प्रभातफेऱ्या काढणे, प्रचारसभा घेणे अशी सरकारविरोधी प्रचार केल्यामुळे ९ महिने शिक्षा व १०० रू. दंड झाला होता. बार्शी तालुक्यातील धामणगाव येथील श्री. सोपान रामजी भोसले यांनी धामणगाव येथे एक चरखासंघ काढला होता. पानगावचे श्री. अंबऋषि बाबुराव विभुते यांनी बाबु गेणूला गाडीच्या चाकाखाली चिरडल्यामुळे सभा घेतली. यावेळी त्यांना प्रचंड मारहाण करण्यात आली. तरीही त्यांनी सरकारविरोधातील कार्य चालूच ठेवले. उपळे दुमाला येथील प्रांताचा तंबू लुटण्यामध्ये यांचा सक्रीय सहभाग होता.[१०]

## ➢ बार्शी तालुक्याचे हैद्राबाद मुक्ती संग्रामातील योगदान :

हैद्राबादच्या निजाम घराण्याचा संस्थापक मीर कमरूद्दिन होय. त्याचे पूर्वज शहाजहान बादशहाच्या कृपेने दिल्लीत स्थायीक झाले. पुढे बादशहाच्या कृपेने इ. स. १७१३ मध्ये मीर कमरूद्दिनची दक्षिणेचा सुभेदार म्हणून नेमणूक झाली. पुढे दिल्ली दरबारातील सत्ता संघर्षाचा फायदा घेऊन त्याने हैद्राबाद येथे स्वतःचे राज्य स्थापन केले. पुढे मुघल सम्राट फर्रूखसियर याने याच कमरूद्दिनला निजाम-उल-मुल्क ही पदवी दिली. ' निजाम ' या शब्दाचा अर्थ ' व्यवस्था ' किंवा ' बंदोबस्त ' असा आहे. तो अतिशय चाणाक्ष बुध्दीचा होता. पुढे महमूदशहा याने निजामाला आसिफजहा ही पदवी दिली. तेव्हापासून या घराण्याला आसिफजहा घराणे म्हणून संबोधले जाते. हा पहिला निजाम अनियंत्रित असला तरी त्याने जनतेच्या कल्याणाकडे सातत्याने लक्ष दिले. त्याने स्थिर शासन निर्माण केले होते. यामध्ये त्याने हिंदू सरदारांचेही सहकार्य घेतले होते. २१ मे १७४८ रोजी हा पहिला निजाम मृत्यू पावला. पुढे त्याच्या वारसामध्ये सत्ता-संघर्ष सुरू झाले. यातून हे घराणे दुबळे बनले. त्याच्या वारसांनी इंग्रजांच्या मर्जीत राहून स्वतःचे अस्तित्व जपले. तरी त्यांची आर्थिक परिस्थिती खूपच वाईट झाली होती. शिवाय निजामाच्या दडपशाहीला लोक कंटाळले होते. निजाम सरकारने सामाजिक जीवनावर विविध निर्बंध लादले. पहिल्या पाच निजामांचे हिंदूविषयक धोरण व्यवस्थित होते. मात्र सहाव्या निजामाने इ. स. १८८५ पासून हिंदू धर्मियाविषयी खूपच जाचक धोरण स्वीकारले. इ. स. १८८५ मध्ये दसरा व मोहरम हे सण एकाच वेळी आले. पण निजामाने हिंदूवर अनेक निर्बंध लादले. इ. स. १९११ मध्ये सातवा निजाम गादीवर आला. याही वेळी निजामाने हिंदूवर जाचक असे निर्बंध लादले. हिंदूंच्या धार्मिक स्वातंत्र्यावर बंधने घातली. त्यामुळेच या संस्थानातील हिंदू जनता निजामाच्या विरोधात आंदोलनाच्या पवित्र्यात ऊभी राहिली.

इ. स. १९२० हा हैद्राबाद मुक्ती संग्रामाचा आरंभ बिंदू मानला जातो. इ. स. १९२३ ते १९३१ या काळात काकीनाडा, मुंबई, पुणे, अकोला येथे राजकीय परिषदा घेण्यात आल्या. यापैकी अकोला येथील परिषदेचे अध्यक्ष व स्वागताध्यक्ष मराठवाड्यातीलच होते. हैद्राबाद मुक्ती संग्रामामध्ये इ. स. १९३७ व १९३८ ही दोन वर्षे अत्यंत महत्वाची मानली जातात. १ जून १९३७ मध्ये परतूर येथे झालेल्या महाराष्ट्र परिषदेच्या अधिवेशनामध्ये जनतेच्या धार्मिक हक्काची पायमल्ली करण्याच्या बाबीचा तीव्र निषेध करण्यात आला. त्यमुळे पुढे निजामाने अशा अधिवेशनामध्ये राजकीय प्रश्नावर चर्चा करण्यावर बंदी घातली होती.[११]

हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यानंतर हिंदुस्थानसमोर जे अनेक महत्वाचे प्रश्न होते, त्यापैकीच एक हैद्राबाद संस्थानाचा होता. हिंदूस्थानच्या स्वातंत्र्यानंतरही हैद्राबाद हिंदुस्थानमध्ये सामील झाले नव्हते. ही काही अचानक घडलेली घटना नव्हती. इंग्रजांच्या ' फोडा आणि झोडा ' या

नितीचा तो एक परिणाम होता. जातीयतेला खास सवलती देण्याच्या इंग्रजी व्यवहाराची हैद्राबादने नुसती रीच ओढली नाही, तर त्यांनी यासंदर्भात कमालीची आघाडी मारली. हिंदूस्थानातून हजारो मुस्लिमांना नोकरीच्या निमित्ताने हैद्राबादमध्ये बोलाविले. इस्लामी संस्थांना भरमसाठ देणग्या दिल्या. शेकडो मुस्लिमांना वर्षासने व अनेक विधी निमित्ताने तनखा व देणग्या दिल्या. उस्मानिया विद्यापीठ स्थापन करून सरकारी नोकऱ्यांची ठेकेदारी बहाल करून व मुसलमान हे राज्यकर्ते आहेत या तत्वाचा प्रचार करून हैद्राबादमधील मुस्लिमांचे संघटन करण्यात आले. अशा परिस्थितीत ' एत्तेहादुल मुसलमीन ' या फाशीवादी इस्लाम संघटनेचा पाठिंबा असलेल्या हैद्राबादमधील नोकरशाहीला स्वतंत्र हैद्राबादची स्वप्ने दिसू लागली होती.[१२]

- **रझाकार संघटना**

इ. स. १९४० मध्ये बहादूर यारजंग यांनी रझाकार ही संघटना स्थापन केली. ' रझाकार ' म्हणजे " धुळीत पडलेल्यांना वर उचलणारा स्वयंसेवक " होय. या संघटनेने हिंदूवर प्रचंड अन्याय केला. ' कासिम रझवी ' हा रझाकारांचा नेता होता. तो मूळचा लातूरचा होता. तो लातूर येथे वकिली करत होता. त्यानेच ही संघटना अतिरेकी बनविली. तो निजामाचा हस्तक होता. निजामाच्या अन्यायापासून मुक्त होण्यासाठी इ. स. १९४५ पासून हैद्राबाद स्वातंत्र्य संग्राम गतिमान होऊ लागला. ७ ऑगस्ट १९४७ ला हैद्राबाद मुक्ती संग्रामाचे शेवटचे पर्व सुरू झाले. निजामाने प्रचंड अत्याचार सुरू केले. त्यामुळे हैद्राबाद स्टेट कॉंग्रेसच्या कृती समितीने भूमिगत कार्यकर्त्यांमार्फत सशस्त्र लढा सुरू केला. यासाठी हैद्राबाद संस्थानाच्या सरहद्दीलगत लढाऊ कॅम्प्स् उघडण्यात आले.

- **हैद्राबाद हिंदू महासभा**

२३ मार्च १९३३ रोजी गुढी पाडव्याच्या मुहूर्तावर हैद्राबाद येथे " हैद्राबाद हिंदू महासभेची " स्थापना झाली. निजामाच्या अत्याचाराला विरोध करण्यासाठी ही संस्था स्थापन झाली होती. हिंदूंच्या दयनीय स्थितीची माहिती लोकमान्य टिळकांच्या केसरी वर्तमानपत्रामुळे सर्वत्र पसरण्यास खूप मदत झाली. महाराष्ट्र हिंदू महासभेने हैद्राबाद हिंदू महासभेस पाठिंबा दिला. तत्कालीन महाराष्ट्र हिंदू महासभेचे नेते आण्णासाहेब भोपटकर यांनी बार्शी तालुक्यातील अनेक वकील, व्यापारी, शिक्षक यांच्याशी सल्लामसलत केली होती. यासाठी ते बार्शी तालुक्यातील तडवळे येथे आले होते. ८ जुलै १९३८ च्या केसरीच्या अंकात यासंदर्भात एक अग्रलेख छापण्यात आला. त्यामुळे जनमत प्रक्षुब्ध बनले.

- **सरहद्दीलगतचे बार्शी तालुक्यातील कॅम्प्स् :**

स्वामी रामानंद तीर्थ व हैद्राबाद स्टेट कॉंग्रेसचे अध्यक्ष दिगंबराव बिंदू यांनी दिल्ली येथे महात्मा गांधी यांची भेट घेऊन हे कॅम्पस् उघडण्याची परवानगी घेतली. हैद्राबाद संस्थानाच्या सरहद्दीलगत असे ११५ लढाऊ कॅम्पस् उघडण्यात आले. यामध्ये बार्शी तालुका व उस्मानाबाद जिल्हा यांच्या सरहद्दीलगत बार्शी तालुक्यामध्ये उभारण्यात आलेल्या कॅम्पस्नी या हैद्राबाद मुक्ती संग्रामामध्ये मोलाचे योगदान दिले.[१३]

**१) बार्शी कॅम्प :**

इ. स. १९४७ ते १९४८ या काळात रझाकाराच्या अत्याचारामुळे अनेक लोकांनी हैद्राबाद संस्थानातून पळ काढला. या लोकांसाठी बार्शी येथे उत्तरेश्वर मंदिरामध्ये बापूराव मास्तर, ग्यानुराव साळुंखे, शिवाजी आर्य इत्यादी कार्यकर्त्यांनी एक कॅम्प सुरू केला. येथे दररोज १०००-१२०० लोक जेवण करत होते. याचा सर्व खर्च स्थानिक कार्यकर्त्यांनी जमा केलेल्या फंडातून भागविला जात. बार्शीतील तात्यासाहेब बोरगावकर यांनी स्टेट कॉंग्रेसच्या ऑफिससाठी स्वतःचे घर विनामूल्य दिले होते. या कॅम्पमधील सैनिकांनी उपळा येथील निजाम पोलीसांशी दिलेल्या सशस्त्र लढ्यात मोतीलाल रामजीवन भूरावत हे शहिद झाले.[१४]

**२) कौडगाव कॅम्प :**

कौडगाव कॅम्प हा चिंचोली कॅम्पच्या मार्गदर्शनाखाली चालतअसे. या कॅम्पचे प्रमुख वासुदेव तेरकर हे होते. या कॅम्पमध्ये ३० मुक्तिसैनिक होते.

**३) अंबेजवळगे कॅम्प :**

हा कॅम्प चिंचोली व गौडगाव कॅम्पच्या दरम्यान होता. या कॅम्पचे प्रमुख नामदेवराव नाडे हे होते. या कॅम्पमध्ये ६० मुक्ति सैनिक होते. या कॅम्पमधील मुक्तिसैनिकांनी अंबेहोळ, जुनवनी, घाटंग्री या ठिकाणी कारवाया केल्या.

### ४) वाघोली कॅम्प :

हा कॅम्प चिंचोली व गौडगाव कॅम्पच्या दरम्यान होता. या कॅम्पचे प्रमुख वसंतराव देशमुख व राजेंद्र देशमुख हे होते. या कॅम्पमध्ये ४७ मुक्तिसैनिक होते. येथील मुक्तिसैनिकांनी सारोळा येथील रझाकाराचा अड्डा हल्ला करून कायमचा बंद केला. बेंबळे पोलीस ठाण्यावर हल्ला करून एका अरबाला ठार मारले. निजामाच्या पोलीस व्हॅनवर हल्ला करून त्यांच्या ताब्यातील अनेक लोकांना मुक्त केले.

### ५) गौडगाव कॅम्प :

बार्शी तालुक्यातील गौडगाव कॅम्प हा एक कृतिशील कॅम्प होता. या कॅम्पचे प्रमुख राजाभाऊ जाधव व नरहरराव मालखरे हे होते. या कॅम्पचे बहुसंख्य मुक्तिसैनिक समाजवादी विचारसरणीचे होते. या कॅम्पमध्ये १५० मुक्तिसैनिक होते.

### ६) चिंचोली कॅम्प :

बार्शी तालुक्यातील या कॅम्पचे प्रमुख रामचंद्र शास्त्री, चंद्रशेखर बाजपेयी व श्रीधर वर्तक हे होते. या कॅम्पमध्ये २५० मुक्तिसैनिक होते. हैद्राबाद मुक्ती संग्रामामध्ये या कॅम्पचे योगदान महत्वपूर्ण मानले जाते. येथील मुक्तिसैनिकांनी निजामाच्या बर्दापूर व अपसिंगा येथील रझाकारावर धाडशी हल्ला केला होता. यामध्ये श्रीधर वर्तक यांना वीरमरण आले.[१५]

येथील मुक्तिसैनिकांनी काही गावांमध्ये असहकाराची चळवळ उभी केली. अनेक गावांमध्ये साराबंदी यशस्वी करून दाखविली. या कॅम्पमध्ये बार्शी तालुक्यातील सुर्डी या गावातील श्री. दगडू केरबा लेकरे, श्री. दत्तात्रय गोविंद वडगावकर, श्री. नागा कृष्णा रोहिले हे मुक्तिसैनिक खूप सक्रिय होते. या कॅम्पमधील मुक्तिसैनिकांनी भूम-परांडयामधील ६२ खेडी निजामाच्या अंमलातून मुक्त केली होती.

हैद्राबाद मुक्ती संग्रामामध्ये उल्लेखनीय योगदान दिलेल्या बार्शी तालुक्यातील काही स्वातंत्र्यसैनिकांची माहिती खालीलप्रमाणे.[१६]

### १) श्री तुकाराम एकनाथ लोहार

श्री तुकाराम एकनाथ लोहार हे बार्शी तालुक्यातील हत्तीज गावचे रहिवासी होते. ' आळणी ' या गावी हैद्राबाद मुक्ती संग्रामाच्या माध्यमातून फिरत असताना ते पकडले गेले. त्यांच्यासह इतर ७ जण व ५ मुले यांना रझाकारांनी गोळ्या घातल्या.

### २) श्री. लाला मारूती वाघमारे

बार्शी तालुक्यातील धामणगाव या गावचे रहिवासी असलेल्या शाहिर श्री. लाला मारूती वाघमारे यांनी पोवाड्याच्या माध्यमातून लोकांना रझाकाराविरूध्द आंदोलनाच्या पवित्र्यात उभे करण्याचे महान कार्य केले. त्यामुळे संतापलेल्या रझाकारांनी त्यांना पकडून जिवंत पुरले. मात्र राष्ट्रप्रेमाणे भारलेल्या श्री. वाघमारे यांनी पुरतानादेखील हातातील तिरंगा ध्वज सोडला नाही.[१७]

### ३) काशीनाथ तुकाराम घोडके

हैद्राबाद मुक्ती संग्रामामध्ये भाग घेऊन श्री रघुनाथराव किसनराव टेके यांच्या मार्गदर्शनाखाली काम केले. निजामाच्या जकात नाक्यांना आगी लावणे, निजामाच्या पोलीस चौकीवर हल्ले करणे, स्टेट कॉंग्रेसची पत्रके वाटणे अशी कामे त्यांनी केली. तसेच त्यांनी गोदामे लुटून धान्य गोरगरीबांना वाटले.

### ४) श्री सखाराम बाबुराव कुलथे

बार्शी शहरातील रहिवासी श्री सखाराम बाबुराव कुलथे यांना हैद्राबाद मुक्ती संग्रामामध्ये भूमिगत राहून कार्य केले. त्यांच्यावर पकड वॉरंट काढण्यात आला होता, मात्र ते शेवटपर्यंत सापडले नाहीत. या संघर्षात त्यांनी सरहद्दीवरील प्रत्येक कॅम्पस् मध्ये जाऊन तेथील मुक्ती सैनिकांना हत्यारे चालविण्याचे प्रशिक्षण दिले. तालुक्यातील शेंद्री येथील श्री मोतीचंद शहा यांच्या वाडयात राहणाऱ्या ४० रझाकारांना ठार मारण्यामध्ये त्यांचे मोलाचे योगदान होते. त्यांनीच या प्रेताची विल्हेवाट लावली. शेंद्री येथील प्रसंग चालू असतानाच त्यांनी स्वतःचा जीव धोक्यात घालून तेथील लोकांना लष्कराच्या ट्रकमधून सुरक्षित स्थळी पोहचविले होते. स्वतः क्रांतिसिह नाना पाटील यांनी श्री. कुलथे यांना मार्गदर्शन केले होते. बार्शी तालुक्यातील श्रीपतपिंपरी येथे श्री आनंदराव विठ्ठलराव पाटील यांच्या वाड्यात राहणाऱ्या रझाकारांवर त्यांनी सशस्त्र हल्ला केला होता. तत्कालीन सेनाप्रमुखांनी त्यांना एक बंदुक दिली होती.

### ५) श्री. रूद्राप्पा विरभद्राप्पा पोटे

श्री. पोटे यांनी भिमाशंकर वायचळ यांच्या मार्गदर्शनाखली हैद्राबाद मुक्ती संग्रामामध्ये भूमिगतांना खूप सहकार्य केले. यामध्ये बुलेटिन वाटणे, छोटी हत्यारे पुरविणे, अन्न पुरवठा करणे अशा बाबींचा समावेश होता.

### ६) दगडू रामा सावंत

बार्शीतील दगडू रामा सावंत यांनी हैद्राबाद मुक्ती संग्रामामध्ये भाग घेऊन आसपासच्या निजामी पोलीस चौक्यावर धाडशी हल्ले केले. रझाकारावर लपून-छपून हल्ले करण्याचे काम त्यांनी सतत केले.

### ७) दिगंबर रामलिंग थळपती

बार्शीमधील दिगंबर रामलिंग थळपती यांनी हैद्राबाद मुक्ती संग्रामामध्ये भाग घेऊन आपल्या जीवाची पर्वा न करता गावोगावी जाऊन निजामाविरूध्द प्रचार व लोकजागृती करण्याचे धाडसी काम केले. याशिवाय मोर्चे काढणे, शस्त्रास्त्रे वाटणे, निजामी राजवटीविरूध्द पत्रके वाटण्याचे काम केले. तसेच राष्ट्रसेवादलाच्या माध्यमातून लोकजागृती व साक्षरतेसाठी शैक्षणिक वर्ग चालविले.

### ८) श्री. रफिउद्दीन अमिन शेख

त्यांनी वैरागचे आझाद मास्तर व गोविंदराव बुरगुटे यांच्या सोबत राहून कार्य केले. कडकनाथवाडी येथील निजामाच्या जकात नाक्यावरील नाकेदारांना पळवून लावून हे जकात नाके यांनी काबीज केले होते. उंबरगेत मिरवणूक काढली म्हणून त्यांना तेथील पोलीस पाटलाने शाळेत कोंडून ठेवले होते. मात्र तेथून ते फरार झाले ते परत कधीच सापडले नाहीत.[१८] श्री. रफिउद्दीन अमिन शेख हे बार्शी तालुक्यातील आगळगावचे रहिवासी होते. हैद्राबाद मुक्ती संग्रामामध्ये भाग घेऊन त्यांनी भूमिगत राहून कार्य केले. स्वतः इस्लाम धर्मीय असूनही इस्लामी निजाम राजवटीच्या विरोधात ते लढले ही उल्लेखनीय बाब होय. [१९]

### ९) भिमाशंकर वायचळ

भिमाशंकर वायचळ यांनी या हैद्राबाद मुक्ती संग्रामामध्ये मोलाचे योगदान दिले. बार्शी तालुक्यातील कसबे तडवळे या गावचे रहिवासी श्री शिवाजी केशव अडसूळ व मोतीलाल रामजीवन भुरावत यांनाही रझाकारांनी मारले. तर तुरूंगातील छळामुळे सदाशिव पाठक मरण पावले. या सर्व घटना भिमाशंकर वायचळ यांच्या समक्ष घडल्या. धामणगावच्या श्री. लाला मारूती वाघमारे यांनाही ठार मारले. त्यांचे स्मारक धामणगाव येथे आहे. तालुक्यातील इतर गावातूनही रझाकाराच्या जुलमास प्रखर विरोध करण्यास प्रोत्साहन दिले.

### १०) शेख हिराजी अब्बास

हे तालुक्यातील पांगरी या गावचे रहिवासी होते. त्यांनी हैद्राबाद मुक्ती संग्रामामध्ये बहुमुल्य असे योगदान दिले. सरकारी बसची नासधुस केली. त्यामुळे त्यांची तुरूंगात रवानगी झाली. पुढे तुरूंगातून मुक्त झाल्यानंतर भूमिगत राहून कार्य केले. रझाकारापासून जनतेचे रक्षण करून त्यांच्या पुनर्वसनाला हातभार लावला. भारत सरकारच्या हैद्राबाद मुक्तिसाठी निघालेल्या सैन्याला रस्ते दाखविले.[२०]

### • निजामाची शरणागती :

भारताच्या स्वातंत्र्यानंतर हैद्राबादच्या निजामाने भारतीय संघराज्यामध्ये सामील होण्यास नकार दिला. रझाकारांनी त्याला पाठिंबा दिला. पुढे यातूनच जातीय दंगली झाल्या. या दंगलीमुळे परिस्थिती आवाक्याबाहेर जात आहे असे दिसताच भारत सरकारने १३ सप्टेंबर १९४८ रोजी भारतीय फौजा हैद्राबादमध्ये घुसविल्या.[२१]

त्याचे नेतृत्व मेजर जनरल चौधरी यांच्याकडे होते. त्यांनी हैद्राबाद संस्थानाच्या चोहोबाजूने सैन्य आत घुसविले. सर्वत्र गोंधळ माजला. १७ सप्टेंबर १९४८ रोजी अवघ्या चार दिवसात सार्वभौमत्वाचे स्वप्न पाहणाऱ्या निझामाने व रझाकाराचे नेतृत्व करून डरकाळ्या फोडणाऱ्या कासिम रझविने हताश होऊन शरणागती पत्करण्याचा निर्णय घेतला. तत्कालीन रेसीडेन्ट श्री. के. एम. मुन्शी यांच्या वतीने निजामाने शरणागती घोषित केली. त्यानंतर मराठवाडा स्वतंत्र भारताचा भाग बनला.[२२]

### ➢ गोवा मुक्तिसंग्रामातील बार्शी तालुक्याचे योगदान :

भारताला स्वातंत्र्य मिळाले तरी गोव्यामध्ये पोर्तुगीजांची सत्ता होती. तेथील जनतेवर पोर्तुगिजांनी खूप अत्याचार केले. स्थानिक लोकांचा विरोध पोर्तुगिजांनी मोडून काढला. त्यामुळे हा लढा देशव्यापी होण्यासाठी व सर्व भारतीयांनी या लढयाला सहकार्य करावे म्हणून ' गोवा विमोचन सहाय्य समिती ' स्थापन करण्यात आली. या समितीमार्फत मुक्तिसैनिकांच्या १० तुकडया पाडण्यात आल्या होत्या. यातील १० व्या तुकडीमध्ये बार्शीतील काशीनाथ जाधव, रणजित सुपेकर, वसंत गोणीकर, सुरडकर हे स्वातंत्र्य सैनिक श्री. म. लु. लिमये यांच्या नेतृत्वाखाली काम करत होते. शेवटी १९ डिसेंबर १९६१ रोजी भारत सरकारने सैन्य पाठवून चारच दिवसांमध्ये गोवा पोर्तुगिजांच्या जुलमातून मुक्त केला.[२३]

या संघर्षात वैराग येथील श्री. मोहिते किसन बाळाराम यांनी इ. स. १९५२-५३ मध्ये गोवा नॅशनल काँग्रेसच्या वतीने गोवा मुक्ती संग्रामामध्ये भाग घेतला होता.[२४] इ. स. १९५५ मध्ये श्री. वसंतराव गोयेकर, श्री. श्रेणिक देवधरे, श्री. दत्तू पाठक, श्री. दगडू कदम, श्री. बापूराव मठपती, श्री. वाळके इत्यादी लोकांनी सक्रिय सहभाग घेतला होता.[२५]

## संदर्भ साधने


१) गॅझेटियर ऑफ बॉम्बे प्रेसिडेन्सी, सोलापूर जिल्हा, इ. स. १८८४, पृ.२७५ ते २९०.
२) भारताची जणगणना, जिल्हा जणगणना हस्तपुस्तिका, सोलापूर, इ. स. १९९१, पृ.१३, १४.
३) गॅझेटियर ऑफ बॉम्बे प्रेसिडेन्सी, सोलापूर जिल्हा, इ. स. १८८४, पृ.३०१ ते ३०३.
४) मुंबई पुराभिलेखागार, भारतीय जनगणना १९६१, फाईल नं आर-४००१५/१, पृ.१४३.
५) मुलाखत, डॉ. द. ग. कश्यपी, बार्शी.
६) येवले. शं. भा, सोलापूर जिल्हयातील स्वातंत्र्य लढा, पृ.७० ते ८६.
७) मुलाखत, प्रा. सौ. प्रमिला माणिकराव देशमुख.
८) बार्शी नगरपालिका शतकोत्तर रोप्य महोत्सव स्मरणिका, जून १९९०.
९) प्रभाकर गुप्ते, महाराष्ट्र प्रदेश स्वातंत्र्य सैनिक महासंघ सदस्य परिचय, पृ.७९, १३३, १३४.
१०) भारतीय राष्ट्रीय काँग्रेस जन्मशताब्दी महोत्सव स्मरणिका, २८ डिसेंबर १९८५
११) महाराष्ट्र राज्य गॅझेटियर, लातूर जिल्हा, भाग १, प्रथम आवृत्ती (मराठी) पृ.११४ ते १२९.
१२) सुलाखे सुशाला, हैद्राबादेतील जनतेचे बंड, इ. स. १९४७, पृ.
१३) महाराष्ट्र राज्य गॅझेटियर, लातूर जिल्हा, भाग १, प्रथम आवृत्ती (मराठी) पृ.१३२ ते १४४.
१४) वसंत पोतदार, हैद्राबाद स्वातंत्र्य संग्राम, तिसरी आवृत्ती, इ. स. २००६, पृ.२१९.
१५) महाराष्ट्र राज्य गॅझेटियर, लातूर जिल्हा, भाग १, प्रथम आवृत्ती (मराठी) पृ.१४४, १४५.
१६) वसंत पोतदार, पूर्वोक्त, पृ.२१५ ते २२२, २४२.
१७) येवले. शं. भा, पूर्वोक्त, पृ.७२, ७३.
१८) प्रभाकर गुप्ते, पूर्वोक्त, पृ.४५, ७७, ७८, १३४ ते १६०.
१९) मुलाखत, स्वातंत्र्यसेनानी श्री. रफीउद्दीन अमिन शेख, आगळगाव.
२०) भारतीय राष्ट्रीय काँग्रेस जन्मशताब्दी महोत्सव स्मरणिका, २८ डिसेंबर १९८५.
२१) महाराष्ट्र राज्य गॅझेटियर, लातूर जिल्हा, भाग १, प्रथम आवृत्ती (मराठी) पृ.१४८.
२२) देशपांडे. द. ग, हैद्राबाद वऱ्हाड मुक्तीसंग्राम, जानेवारी १९८७, पृ.१३२.
२३) प्रभाकर गुप्ते, पूर्वोक्त, पृ.१४३.
२४) भारतीय राष्ट्रीय काँग्रेस जन्मशताब्दी महोत्सव स्मरणिका, २८ डिसेंबर १९८५.
२५) येवले. शं. भा, पूर्वोक्त, पृ.७३.